तिथे पाळत अधिक ठेवण्यात येत होती, १९८०–८१ व ९५–९६ या वर्षी त्या संबंधीची हालचाल पकडली जाऊन दबाव आणून, अणुचाचण्या बंद केल्या होत्या. १९९८ मध्ये शास्त्रज्ञांनी व भारतीय सैन्यदलातील अभियांत्रिकीच्या तुकडीने वेगवेगळे मार्ग अवलंबून गुप्तता पाळली. तिथे चाचणीच्या तयारीचा मागमूसही दिसायला नको म्हणून सर्व शास्त्रज्ञ तंत्रज्ञाना आपापल्या समकक्ष सैनिकी गणवेश देण्यात आले जेणे करून अन्य नागरीकांची वर्दळ सैन्यतळावर दिसणार नाही, डॉ कलाम हे मेजर जनरल पृथ्वीराज म्हणून तर डॉ. आर. चिंदबरम हे मेजर जनरल नटराज म्हणून वावरत होते. दुसरे म्हणजे दोन सैन्य तुकड्यांमध्ये खेळाचे सामने उदा. फुटबॉल, हॉकी, क्रिकेट असे चाचणीच्या स्थळीच होत असत व गुप्त हेरगिरी करणाऱ्यांस व हेर उपग्रहाद्वारे सर्व नेहमी प्रमाणेच असल्याचा संदेश जाई. तसेच आकाश क्षेपणास्त्राच्या बालेश्वर चाचण्यांचा प्रोपोगंडा केल्याने हेरांचे लक्ष्य भलतीकडेच जाई. ११ मे १९९८ तीन व १३ मे ला दोन अशा पाच अणुचाचण्या यशस्वी केल्या. व जागतिक विरोधाला सक्षमपणे तोंड दिले. पाचही चाचण्यांची थोडक्यात माहिती खालील प्रमाणे शक्ति –I – ४५ Kt (किलो टन TNT) क्षमतेचा नियंत्रित स्फोट ज्याची रचना २००Kt केली परंतु शेजारच्या गावांमध्ये नागरी वस्तीत जिवित व वित्त हानी होऊ नये म्हणून. हा अणु विखंडन ने सुरवात करून अणु संलयन तत्वावर काम करणारा युरोनियम चा उपयोग केलेला हायड्रोजन बॉम्ब ज्याला थर्मोन्युक्लियर डिव्हाईस ही म्हणतात.



शक्ति–II प्ल्युटोनियम अंतर्गामी स्फोट तंत्रज्ञान वापरून १५ Kt क्षमतेचा की जो बॉम्बर अथवा क्षेपणास्त्र द्वारा डागता येईल. १९७४ चे सुधारित तंत्रज्ञान वापरून हा बॉम्ब बनवला होता व अणु विखंडन तत्वाधारित होता. शक्ति–III - रेषीय स्फोट घडवून ''Non Weapon Grade" प्ल्युटोनियम चा प्रायोगिक बॉम्ब, अणु विखंडन आधारित ०.३ Kt क्षमतेचा तोफद्वारा डागण्यासाठीचा अणुबॉम्ब शक्ति–IV ०.५ Kt क्षमतेचा प्रायोगिक प्ल्युटोनियम अणुबॉम्ब शक्ति–V - ०.२ Kt क्षमतेचा प्रायोगिक अणुबॉम्ब थोरियम व युरेनियम U२३३ वापरले अशा पाचही यशस्वी चाचण्यांनंतर आपल्याकडे सर्व प्रकारच्या अणुबॉम्बचे म्हणजे परमाणुबॉम्ब हायड्रोजन बॉम्ब, तसेच विमानाद्वारे गुरुत्व आधारित अथवा क्षेपणास्त्रे द्वारा डागले जाणारे त्याच प्रमाणे तोफेने डागता येणाऱ्या तोफगोळ्यांच्या स्वरूपात ''सब किलोटन'' क्षमतेच्या अणुबॉम्बचे ही तंत्रज्ञान विकसित करून भारतदेश जगाच्या पाठीवर समर्थ व सशक्तपणे उभा आहे व भारताने, महासत्तेच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे.

◆

**काशीनाथ देवघर**
मोबा.: ९८८१२५३४२५